# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## मा. ह प्रभाग मासीक सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ५

## (स भा वृ त्तां त)

दिनांक – ०५/०७/२०१८ वेळ. दु. १२.०० वा.

.................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि.५/०७/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहामध्ये" आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| १ | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा.सुलक्षणा राजू धर | सदस्या |
| ३ | मा.शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ४ | मा.सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| ५ | मा.बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| ६ | मा.आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| ७ | मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| ८ | मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| ९ | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| १० | मा.चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| ११ | मा.संतोष बबन कांबळे | सदस्य |
| १२ | मा.सोनवणे शारदा हिरेन | सदस्या |
| १३ | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | सदस्या |
| १४ | मा.अनिकेत राजेंद्र काटे | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय खाबडे (कार्यकारी अभियंता वि), श्री.पवार आर.एस. (कार्यकारी अभियंता पापु), श्री. रामदास तांबे (कार्यकारी अभियंता पापु), श्री.शिरीष पोरेड्डी (उप.भियंता स्था), श्री.विजयसिंह भोसले (उप.अभियंता स्था), श्री.दिलीप धुमाळ (उप.अभियंता वि), श्री.पाटील एस.बी. (उप.अभियंता पापु), श्री.ऐ.बी.कोंडे (उप अभियंता जनि), श्री.नरोटे सुनिलदत्त (उप अभियंता स्था.उ), श्री.मोहन खोंद्रे (उप अभियंता झोनिपु), श्री.संजय काशिद (उप अभियंता BRT s), डॉ. शंकर जाधव (उप अधिक्षक ycm), श्री.डी.एस.सासवडकर (सहा. आरोग्याधिकारी), श्री. संतोष लांडगे (उद्यान सहाय्यक वृक्ष), श्री.जे.व्ही.पटेल (उद्यान निरीक्षक उ), श्री.प्रदीप बारांथे (लेखाधिकारी), श्री.समीर दळवी (क.अ.वि), श्री.भंडारी एस.पी. (क.अ.स्था), श्री. दिग्विजय पवार (क.अ.पापु), श्रीम.मोरे ए.ए (क.अ. स्था.उ), श्रीम.यादव प्रिती (क.अ.जनि), श्री.अमित दिक्षित (क.अ.पापु), श्री. निलेश दाते (क.अ.पापु), श्री.महेंद्र देवरे (क.अ.स्था), श्री.विजय कांबळे

(क.अ.स्था), श्री.सानप एस.एस. (क.अ.स्था), श्री.बाळासाहेब शेटे (क.अ. बी.आर.टी.एस.), श्री.मनोज खरटमोल (क.अ.पापु), श्रीम.जयश्री साळवे (क्रीडा पर्यवेक्षक), श्री.आर.एस.माडे (अतिक्रमण),श्री.इंगेवाड एस.एस. (आ.नि), श्री.सुनील चौहान (आ.नि), श्रीम.रश्मी तुंडलवार (आ.नि), श्री.उध्दव डवरी (आ.नि) इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

दि. ७/०६/२०१८ रोजी झालेल्या मासीक सभेचा (कार्यपत्रिका क्र.३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

<u>उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –</u>

विषय क्र.१) मुंबई - पुणे रस्त्यावरील दापोडी येथील नविन पुलास "जगदगुरु संत तुकाराम महाराज पुल" (पिंपरीकडून पुण्यास जाणा-या ) व "संत ज्ञानेश्वर महाराज पुल" (पुण्याकडून पिंपरीकडे जाणा- या) असे नाव देणेबाबत - मा.आशा धायगुडे – शेंडगे व मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) प्रभाग क्र. २० येथील १२.०० मी.डी.पी. रस्त्यातील बाधित संडास ब्लॉक काढणेबाबत - मा. सुजाता पालांडे व मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) दापोडी येथील सी.एम.ई. समोरील स्वच्छतागृह पाडून नवीन बांधणेबाबत - मा.आशा धायगुडे - शेंडगे व मा. माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>

ठराव क्र - ११ | विषय क्र - १
दि - ५/७/२०१८ | विभाग – स्थापत्य
सुचक - मा. आशा धायगुडे - शेंडगे | अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

संदर्भ - मा. आशा धायगुडे – शेंडगे, मा. माधवी राजापुरे यांचा दि. ५/ ७ / २०१८ चा प्रस्ताव

दापोडी येथील मुळा नदीवर नवीन पुल नुकताच वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. तरी या पुलास "जगदगुरु संत तुकाराम महाराज पुल" ( पिंपरीकडून पुण्यास जाणा-या ) व "संत ज्ञानेश्वर महाराज पुल" ( पुण्याकडून पिंपरीकडे जाणा-या ) असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - १२
दि - ५/७/२०१८
सुचक - मा. सुजाता पालांडे

विषय क्र - २
विभाग – स्थापत्य
अनुमोदक – मा.शारदा सोनवणे

संदर्भ - मा. सुजाता पालांडे, मा. शारदा सोनवणे यांचा दि. ५ / ७ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २० येथील शंकरवाडी नाल्यापासून जे.जे.ग्लास पर्यंत रेल्वेकडेचा १२.०० मी.डी.पी. रस्ता प्रस्तावित आहे. तरी सदरचा रस्ता विकसित करण्याचे काम हाती घेतलेले आहे. जेणेकरुन जुना मुंबई – पुणे रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होवून लोकांकरिता सोयीचे होईल.

सदरचा १२.०० मी. डी.पी. रस्ता या कामात शंकरवाडी नाल्याजवळ संडास ब्लॉक बाधित होत आहे. तरी रस्ता विकसित करणेकामी सदरचा संपुर्ण संडास ब्लॉक तोडणे आवश्यक आहे. तरी संडास ब्लॉक पाडणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १३
दि - ५/७/२०१८
सुचक - मा. आशा धायगुडे - शेंडगे

विषय क्र - ३
विभाग – आरोग्य
अनुमोदक - मा. माधवी राजापुरे

संदर्भ - मा. आशा धायगुडे – शेंडगे, मा. माधवी राजापुरे यांचा दि. ५/ ७ / २०१८ चा प्रस्ताव

दापोडी येथील सुलभ संस्थेस दिलेले स्वच्छतागृह ( स्वच्छतेसाठी ) अत्यंत खराब,दुरावस्था झालेली आहे. तरी ते स्वच्छतागृह पाडून "स्वच्छ भारत" अंतर्गत नव्याने बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

Kamble
(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत )
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे / १० / कावि / १२० / २०१८
दिनांक : ९ / ०७ / २०१८

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर